


**एस. एम. जोशी सभागृह : निर्मलाताई पुरंदरे यांच्यावरील 'आत्मसिद्धा' पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी (डावीकडून) डॉ. अरुणा ढेरे, पुरंदरे, पवार आणि डॉ. शिकारपूर.**

# निर्मलाताईंमध्ये साधेपणाची प्रचिती

## डॉ. अरुणा ढेरे यांचे मत : 'आत्मसिद्धा' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे, ता. ५ :** ''संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडत स्वतःच स्वतःला घडविणे, याचीच प्रचिती निर्मलाताईंकडे पाहून येते. सहजपणे जीवन जगणे हे त्यांच्याकडे पाहिल्यावर कळते,'' अशा शब्दांत कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाताई पुरंदरे यांच्याविषयी सोमवारी कृतज्ञता व्यक्त केली. निर्मलाताईंनी संस्थेतील विद्यार्थी आणि महिलांच्या विकासावर भर दिला असल्याचेही ढेरे यांनी सांगितले.

कॉंटिनेन्टल प्रकाशनातर्फे 'आत्मसिद्धा' या निर्मलाताई पुरंदरे यांच्यावरील पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्या वेळी डॉ. ढेरे बोलत होत्या. या कार्यक्रमात संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर उपस्थित होते. हे पुस्तक माणिक कोतवाल यांनी लिहिले आहे. या पुस्तकाच्या ई-आवृत्तीचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. मोठ्या माणसांमधील अंगभूत साधेपणा काय असतो, याची अनुभूती निर्मलाताईंकडे पाहिल्यावर येते, असे डॉ. ढेरे यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, ''समाजात चांगला बदल घडवायचा असेल, तर मुळापासून बदल करण्याची आवश्यकता आहे. हेच काम निर्मलाताईंनी केले. त्यांनी पैसा मिळविणे हे उद्दिष्ट कधीच ठेवले नाही.''

निर्मलाताईंशी असणारे ऋणानुबंध उलगडताना पवार म्हणाले, ''निर्मलाताईंचे काम मी जवळून पहिले आहे. त्यांच्यामुळेच विद्यार्थी सहायक समितीतील मुलींची संख्या दुप्पट झाली. समितीतील विद्यार्थ्यांना घडविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि महर्षी धोंडो केशव कर्वे अशा समाजसुधारकांच्या पुष्पमाळेतील निर्मलाताई एक पुष्प आहेत. एक स्त्री घडविली तर एक कुटुंब घडते. त्याप्रमाणे निर्मलाताईंनी हजारो कुटुंबे घडविली आहेत.''

समाजातील चांगले काम करणाऱ्या संस्था, व्यक्तींना हातभार लावणे, हे आपले सामाजिक कर्तव्य आहे, असेही पवार यांनी या वेळी सांगितले. कार्यक्रमात कोतवाल, बुक गंगा डॉट कॉमच्या सुप्रिया लिमये, डॉ. शिकारपूर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात निर्मलाताईंवर आधारित माहितीपटही दाखविण्यात आला. प्रास्ताविक प्रकाशिका देवयानी अभ्यंकर यांनी केले. सूत्रसंचालन विनया देसाई यांनी केले.